# जिग्नेश शाहांची अवस्था चक्रव्युहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी

**पुणे । प्रतिनिधी**

मोठ्या कष्टाने आणि स्वत:च्या बुद्धीने उभे केलेल्या मार्केट साम्राज्याची नॅशनल स्पॉट एक्स्चेंज लि. (एनएसईएल) मध्ये पेमेंट डीफॉल्ट घडवून जिग्नेश शाहांचे साम्राज्य राजकारणी, नोकरशहा, स्वार्थी भांडवलदार आणि दलालांच्या चांडाळचौकडीने कट रचून उध्वस्त केले. दुष्टचक्राविरुध्द बंड केलेल्या जिग्नेश शाहांची अवस्था चक्रव्युहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी झाली असे मत द टार्गेट या पुस्तकाचे लेखक वरिष्ठ पत्रकार शांतनु गुहा रे यांनी व्यक्त केले. जिग्नेश शाहांनी बाजारातील मक्तेदारी मोडून काढली व त्याची किंमत म्हणून त्यांच्या जागतिक साम्राज्याचा कसा विध्वंस करण्यात आला याचा गौप्यस्फोट करणाऱ्या लेखक वरिष्ठ पत्रकार शांतनु गुहा रे यांच्या द टार्गेट या पुस्तकाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन लोकसत्ताचे सहायक संपादक मुकुंद संगोराम यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ऑथर्सफ्रंटचे संस्थापक मनीष पुरोहित हे उपस्थित होते. शांतनु गुहा रे म्हणाले, जिग्नेश शाहा यांची कहाणी मोठी मनोरंजक आहे. त्यातील मनोरंजक गोष्ट म्हणजे कुठलेही पाऊल उचलताना तुम्ही कसे धाडसी असले पाहिजे याचे उदाहरण म्हणजे जिग्नेश शाहा आहेत. एक व्यक्ती आपल्या बुद्धीने, कष्टाने मोठे साम्राज्य कसे उभे करतो आणि एका धक्क्याने त्या व्यक्तीला त्या साम्राज्यापासून कसे दूर केले जाते याबाबत हे पुस्तक आहे. मुकुंद संगोराम म्हणाले, लोक बुद्धीला घाबरतात याचा प्रत्यय जिग्नेश शाहा यांच्या प्रकरणात बघायला मिळतो. त्याला कारण त्यांच्याकडे पारदर्शकता होती. आजकाल पारदर्शक राहणे हाच मोठा धोका झाला असून ज्यांना सत्याच्या पाठीमागे उभे राहायचे आहे त्यांच्यासाठी जिग्नेश शाहा यांची कथा प्रेरणादायी आहे.